अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय,
९१ सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- २८ /०७/२०२६

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | २१/२०२६ |
| कलम | कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी | १) संतोष सोनू पाताडे, ५१ वर्षे, खाजगी इसम<br>२) देवेंद्र चंद्रकांत बांदवडकर, ५२ वर्षे, खाजगी इसम |
| लाचेची मागणी | रू. १०,७००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ६,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांची मारूती सुझुकी वॅगनार मो/कार ही बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून दिनांक १४/०७/२०२६ रोजी टोईंग करण्यात आली होती. सदरची मो/कार सोडविण्याकरीता श्री. संतोष पाताडे यांनी तक्रारदार यांचेकडे रू. १०,७००/- इतक्या लाचेची मागणी केली होती. परंतू तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २३/०७/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २३/०७/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान देवेंद्र बांदवडकर यांनी तक्रारदार यांची मो/कार सोडण्याकरीता बी.एम.सी. ला पैसे दयावे लागतात, असे सांगून तडजोडीअंती रू. ६,०००/- लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक २७/०७/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान संतोष पाताडे यांना देवेंद्र बांदवडकर यांच्यावतीने तक्रारदार यांचेकडून कोणतीही शासकीय पावती न देता रू. ६,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन उपरोक्त नमूद खाजगी इसम यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :- श्रीमती रेखाबाई दुधभाते, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. सुनिल हारूगडे, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अजित सुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**हेल्पलाईन क्र.** :- **1064,** **दूरध्वनी क्र.** :- **022-24921212,**
**फॅक्स क्र.** :- **022-24922618** **व्हॉट्सअप क्र.** :- **8828241064**
**वेबसाईट** :- **acbmaharashtra.gov.in,**
**ईमेल** :- **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**